# नवी मुंबई महानगरपालिका
## शिक्षण विभाग

### CBSE शाळांतील नर्सरीच्या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सन 2023-24

मा. महासभेच्या मान्यतेने नवी मुंबई महानगरपालिका मार्फत कोपरखैरणे, सेक्टर-11 व नेरूळ, सेकटर-50 या ठिकाणी सीबीएसई बोर्डाशी संलग्न शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. या शाळांमध्ये सन 2023-24 साठी नर्सरी वर्गा करीता प्रवेश प्रक्रिया राबविणेत येत आहे. प्रवेश पुर्णत: नि:शुल्क असल्याने या सुविधेचा लाभ सार्वाधिक पालकांनी घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. प्रवेशाबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| वयोगट | : | 3+ वर्षे पूर्ण (31 डिसेंबर 2023 रोजीचे) |
| प्रवेश संख्या | : | 120 प्रती शाळा |
| आवश्यक कागदपत्रे | : | पाल्याचा जन्मदाखला, जातीचा दाखला, पासपोर्ट साईझ फोटो, आधारकार्ड व वडिलांचा रहिवासी पुरावा. |
| प्रवेश फॉर्म भरण्याची कार्यपध्दती | : | उक्त नमूद शाळेतुन नि:शुल्क प्रवेश अर्ज दिनांक 25/03/2023 पर्यंत (वेळ सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 वाजेपर्यंत) उपलब्ध आहेत. पालकांनी सदर अर्ज आवश्यक कागद पत्रांसह दिनांक 25/03/2023 पर्यंत संबंधित शाळेत सादर करावे. |
| सुविधा | : | सुसज्य शाळा इमारती, प्रशिक्षित शिक्षक, नि:शुल्क शैक्षणिक साहित्य. |

**प्रवेशासाठी आवश्यक अटी :**

1) प्रवेशासाठी शाळेपासून 1 कि.मी. चे आत अंतरावर राहणा-या विदयार्थ्यांना प्राधान्य देणेत येईल.

2) 31 डिसेंबर 2023 रोजी उक्त नमूद केल्याप्रमाणे वय 3 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

3) प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास नियुक्तीसाठी लॉटरी पध्दत अवलंबविण्यात येईल

4) शिक्षण नि:शुल्क असुन बस सेवा उपलब्ध असणार नाही.

5) शाळा प्रवेशाचे सर्व अधिकार मा.आयुक्त, नमुंमपा यांचे स्वाधीन राहतील.

**(योगेश कडुसकर)**
**उप आयुक्त (शिक्षण)**
**नवी मुंबई महानगरपालिका**